**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**प्लॉट क्र. जी. - ९, प्रकाशगड, प्रोफेसर अनंत काणेकर मार्ग, बांद्रे (पूर्व), मुंबई -४०००५१.**
**वेबसाईट : www.mahadiscom.in**

## जाहीर सूचना

**पेण मंडलाअंतर्गत येणा-या क्षेत्रात भार नियमन शून्यावर आणण्यासाठी विश्वसनियता शूल्क वसूल करण्याची मान्यता मिळावी म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितने (मराविविकंम) केलेल्या विनंती अर्जावरील सूचना व आक्षेप.**

**(प्रकरण क्र. १४३/२००८)**

१. पेण मंडलाअंतर्गत येणा-या क्षेत्रात भार नियमन शुन्यावर (भानिशु) आणण्यासाठी विश्वसनियता शुल्क वसुल करण्याची मान्यता मिळावी म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितने (मराविविकंम) विनंती अर्ज (प्रकरण क्र. १४३/२००८) दाखल केला आहे. आयोगाने विनंती अर्ज शुक्रवार दिनांक २४ एप्रिल २००९ रोजी दाखल करुन घेतला आहे आणि विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६४ (२) अनुसार मराविविकंमला जाहीर सूचना प्रकाशित करुन जनतेकडून सूचना आणि हरकती मागविण्याचे निदेश दिले आहेत.

**२. विनंती अर्जाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :-**

| **तपशिल** | **पेण मंडल** |
|---|---|
| अंतरिम फ्रेंचायझीचे नाव | ह्युमनिस्ट कन्झ्युमर्स कौन्सिल (एचसीसी) |
| प्रत्येक दिवशी लागणारा अतिरिक्त विद्युत पुरवठा मेगावॅट मध्ये | २८ मे.वॅ. |
| अतिरिक्त विद्युत पुरवठयाचा कालावधी | १२ तास |
| **गृहिते** | |
| भानिशु क्षेत्रातील वितरण हानी (%) | ५.३३ % |
| भानिशु योजना लागू करावयाचा कालावधी | एप्रिल २००९ ते मार्च २०१० (एक वर्ष) |
| विश्वसनियता शुल्क (रु. /कि वॅ. तास) | रुपये ०.१८ प्रति युनिट (रु/कि.वॅ.तास) |
| विश्वसनियता शुल्क आकारणीचा कालावधी | एप्रिल २००९ ते मार्च २०१० (एक वर्ष) |
| भानिशु योजनेसाठी विचारात घेण्यात आलेले प्रति महिना सरासरी भारनियमनाचे दिवस | २२ दिवस |
| विश्वसनियता शुल्क आकारणी पासून वगळलेले ग्राहक प्रवर्ग | प्रतिमहिना १०० युनिटपर्यंत वीज वापर असलेले घरगुती ग्राहक व कृषि ग्राहक |

३. लेखी विनंती केल्यास खालील कागदपत्रांच्या प्रती मराविविकंमच्या खाली नमूद केलेल्या कार्यालयात मिळतील.

क. प्रस्तावांचा कार्यकारी सारांश (मराठी किंवा इंग्रजी भाषेत - विनामूल्य)

ख. सविस्तर विनंती अर्ज (इंग्रजीमध्ये )"महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित" यांच्या नावे डी.डी /धनादेशाव्दारे/रोखीने रुपये २५/- प्रदान केल्यास

| **कार्यालय** | **पत्ता** | **दूरध्वनी /फॅक्स क्रमांक** |
|---|---|---|
| मुख्य कार्यालय | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१. | ०२२ -२६४७४२११/ २६४७२१३१ |
| पेण मंडल कार्यालय | अधीक्षक अभियंता, मराविविकंम, सं. व सु. मंडल, २२ े व्ही उपकेंद्र यार्ड, अंतोरे रोड, पेण , जि.रायगड -४०२१०७. | ०२१४३-२५३५६८/ २५२७२४ |
| गोरेगाव विभाग | कार्यकारी अभियंता , मराविविकंम, बांधकाम व सं.व सु. विभाग, स्टेट बँक ऑफ इंडियाजवळ, गोरेगाव, ता. माणगाव, जि.रायगड. | ०२१४०-२५०८०६/ २५१६५१ |
| पनवेल (ग्रामिण) विभाग | कार्यकारी अभियंता, मराविविकंम, पनवेल ग्रामिण सं.व सु. विभाग, भिंगारी, तालुका पनवेल, जिल्हा रायगड-४०२२०६. | ०२२-२७४५६२९०/ २७४५६८३९ |
| अलिबाग विभाग | कार्यकारी अभियंता, मराविविकंम, अलिबाग सं.व सु. विभाग, मराविम वसाहत, २२ केव्ही उपकेंद्र, अलिबाग चंद्रा, अलिबाग, जि. रायगड- ४०२२०१. | ०२१४१-२२६३२२/ २२५८२२ |

४. महावितरण यांनी या जाहीर सूचनेव्दारे उक्त विनंती अर्जासंबंधात जनतेकडून हरकती/सूचना/अभिप्राय मागवाव्यात असे मा. आयोगाचे निदेश आहेत. जनतेने आपल्या हरकती/सूचना/अभिप्राय यांच्या सहा प्रती माननीय सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,१३ वा मजला,सेंटर क्र. १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४००००५. (फॅक्स क्र. २२१६३९७६ ई मेल mercindia@mercindia.org.in) या पत्त्यावर सोमवार दिनांक १८ मे २००९ पर्यंत मिळतील अशा बेताने पाठवाव्यात. या सोबत अशा हरकती/सुचना/अभिप्राय याची एक प्रत अर्जदार म्हणजे कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना पाठविल्याचा पुरावा जोडण्यात यावा.

५. हरकती/सूचना/अभिप्राय दाखल करु इच्छिणा-या प्रत्येक व्यक्तिने इंग्रजी किंवा मराठी भाषेतील ६ प्रती, त्यांवर प्रेषकाचे संपूर्ण नाव, टपालाचा पत्ता व असल्यास, ई मेल पत्ता यांसहित पाठवाव्यात. एखाद्या ग्राहक संघटनेच्या वतीने अथवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने हरकती दाखल करण्यात येत असल्यास तसे स्पष्ट नमूद करावे. प्रेषकास आयोगापुढील जाहीर सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहण्याची इच्छा असल्यास तेही नमूद करावे. अशा व्यक्तिस आयोगाकडून गुरुवार दिनांक २१ मे २००९ रोजी राजस्व सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, हिराकोट तलावाजवळ, अलिबाग, जिल्हा रायगड या ठिकाणी करण्यात येणा-या सुनावणीस उपस्थित राहण्याची संधी देण्यात येईल व त्याकरिता निराळी सूचना दिली जाणार नाही.

६. सोमवार दिनांक १८ मे २००९ पर्यंत प्राप्त झालेल्या प्रत्येक हरकती/सूचना/अभिप्राय यांना महावितरण कंपनीकडून तीन दिवसात परंतु गुरुवार दिनांक २१ मे २००९ पूर्वी उत्तरे देण्यात येतील. कंपनी तर्फे देण्यात आलेल्या उत्तरावर आक्षेपक त्यांची प्रत्युत्तरे किंवा उत्तरे जाहीर सुनावणीच्या वेळी किंवा उशिरात उशिरा गुरुवार दिनांक २८ मे २००९ पर्यंत दाखल करु शकतात.

७. विनंतीअर्जाची तपशिलवार कागदपत्रे आणि कार्यकारी सारांश मराविविकंमच्या www.mahadiscom.in या वेबसाईटवरही उपलब्ध आहे. तसेच कार्यकारी सारांश आयोगाची वेबसाईट www. mercindia.org.in वर डाऊनलोड करुन घेण्याच्या स्वरुपात (विनामूल्य) उपलब्ध आहे.

सही/-

नाव : श्री. मारुती देवरे
पदनाम : कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित